SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103, 2609101

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
ज्ञानमेवामृतम्
Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/चव्हाण/17 दि. 08.01.2020

## स्मरणपत्र

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मा. अधिविभागप्रमुख
विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :– मार्च/एप्रिल 2020 मध्ये उन्हाळी सत्रामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा प्रारंभीच्या तारखा निश्चित करणेबाबत.**
**संदर्भ :– या कार्यालयाचे शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/चव्हाण/316, दि. 21.12.2019 चे पत्र**

महोदय/महोदया,

आपणास कळविणेत येते की, मार्च/एप्रिल 2020 मध्ये होणा–या उन्हाळी सत्रातील परीक्षेचे आयोजन दि. 27 मार्च 2020 पासून करणे प्रस्तावित असून याकरीता विद्यापीठ अधिविभाग व महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येणा–या पदव्युत्तर लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांच्या प्रारंभीच्या सत्रनिहाय तारखा निश्चित करून दि. 31. 12.2019 पर्यंत परीक्षक नियुक्ती विभाग (Pre-Exam) यांच्याकडे (appointment.a@unishivaji.ac.in या ईमेल वर ) न चुकता पाठविण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार आपणास कळविणेत आले आहे.

तथापि, अद्याप काही अधिविभाग/महाविद्यालये यांचेकडून माहिती प्राप्त झालेली नसल्याने Date of Commecement जाहीर करण्यास अडचणीचे होत आहे.

**तेंव्हा सदर माहिती सोमवार दि. 13/01/2020 पर्यंत या कार्यालयाकडे सादर करण्यात यावी. नियोजित वेळेत परीक्षेचे वेळापत्रक प्राप्त न झाल्यास परीक्षा विभागाकडून परीक्षा प्रारंभिच्या तारखा निश्चित करण्यात येतील. निश्चित करण्यात आलेल्या परीक्षांच्या तारखा व वेळ यामध्ये नंतर कोणत्याही परिस्थितीत बदल करता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

टिपः **अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणा–या एमएचटी–सीईटी–2020 या सामाईक प्रवेश परीक्षेदिवशी संगणकाशी संबंधीत लेखी/प्रात्यक्षिक परीक्षा आयोजित करण्यात येवू नये.** (सोबत आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे दि. 05.12.2019 चे पत्र माहितीसाठी जोडले आहे.)

प्रतः

1. बी. एस्सी/एम.एस्सी. परीक्षा विभाग
2. इतर परीक्षा विभाग 1, 2, 3, 4

यांना पुढील कार्यवाहीसाठी